ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34


वर्ष ४०

पुणे, बुधवार, ६ नोव्हेंबर, १९७४

अंक २१



# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, जीन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेही नेसाल तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड व चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

☆ अर्थ ☆

बुधवार, ६ नोव्हेंबर, १९७४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

### गरीब देशांच्या मदतीत कपात करू नका

जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. मॅक्नामारा ह्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक व सामाजिक मंडळापुढे भाषण करताना श्रीमंत देशांकडून गरीब देशांना करण्यात येणाऱ्या मदतीचे प्रमाण कमी करण्याऐवजी वाढविण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, मदत वाढविण्यासाठी श्रीमंत देशांतील लोकांच्या विलासी राहणीमानात थोडीशी कमतरता सोसावी लागली तरीही ही गोष्ट करण्यात आली पाहिजे. गरीब देशांना द्यावयाची मदत ही सतत चालणारी नैतिक जबाबदारीची बाब आहे; भरभराटीचा काळ असला म्हणजेच केवळ करावयाची बाब नाही. आज जगात १०० कोटी लोक दारिद्र्यावस्थेत दिवस कंठीत आहेत तर विकास पावलेल्या देशांतील सामान्य माणूससुद्धा संपत्तीचा भरपूर उपभोग घेत आहे. गरीब देशांतील लोकांच्या कल्पनेतही येत नाही असे समृद्ध जीवन तो जगत आहे. इंधनाच्या वाढलेल्या किमती आणि चलनवृद्धी ह्यांच्यामुळे श्रीमंत लोक एकदम गरीब झाले आहेत असे म्हणणे चुकीचे आहे. ह्याचा अर्थ इतकाच आहे की श्रीमंतीची परंपरा लाभलेले देश आज त्यांच्या अपेक्षे-इतके अधिक श्रीमंत झालेले नाहीत. सुमारे २ वर्षांपूर्वीच्या मानाने ते आजही अधिक श्रीमंत झालेले आहेत; आणि विकसनशील देशांशी तुलना करता तर ते मोजता न येण्याइतके सधन झाले आहेत. प्रगत देशातील नागरिक गरीब देशातील नागरिकापेक्षा ४० टक्के अधिक उष्णता देणारे अन्न खातो. तेथील साक्षरतेचे प्रमाण चौपटीने अधिक आहे; बालमृत्यूंचे प्रमाण ९० टक्क्यांनी कमी आहे आणि आयुष्य जगण्याची अपेक्षा ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

---

### खादाड श्वेतवर्णीयांनी जरा कमी खावे

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शेती व अन्नविषयक उपसंघटनेच्या युरोपीय विभागाची परिषद स्वित्झर्लंडमध्ये भरली होती. युरोपीय विभागाचे ३३ युरोपिअन देश सदस्य आहेत. परिषदेत नॉर्वेच्या प्रतिनिधीने काही परखड विचार मांडले. तो म्हणाला की जगात आज असंख्य लोक उपासमारीने ग्रासलेले आहेत. त्यांना वाचविण्यासाठी अनेक प्रकारचे उपाय करण्यात यावेत असे सुचविण्यात येते. एका उपायाची दखल मात्र फारशी घेण्यात येत नाही. युरोपमधील अनेक देशात खादाडांची संख्या खूप मोठी आहे. त्यांनी आपल्या आहारावर नियंत्रण ठेवले तर जगातील उपाशी लोकांना दोन घास मिळण्याच्या कामी बरीच मदत होईल. युरोपात अन्नावर तुटून पडून त्याचा फडशा पाडणाऱ्या खादाडांची संख्या बरीच आहे. त्यांनी आपल्या जिभेला थोडा लगाम घातला तर विकसनशील देशांतील लोकांना पुरविण्यासाठी अन्नधान्य व इतर पदार्थ मोकळे होऊ शकतील. शिवाय, अन्न बेताने खाण्याचा उपाय खादाड असणाऱ्या लोकांच्याही हिताचा आहे. खादाड माणसाच्या प्रमाणाबाहेर असणाऱ्या आहारामुळे त्यांची प्रकृती चांगली राहात नाही. तीत बिघाड होतो आणि त्यांना डॉक्टरांचे पाय पुन्हा पुन्हा धरावे लागतात. प्रगत देशांत गेल्या काही वर्षांत हृदयविकाराचे प्रमाण सतत वाढत चाललेले आहे. वैद्यकीय दृष्ट्या ह्याची कारणे काय आहेत ती आता स्पष्टपणे समजलेली आहेत. म्हणून शेती व अन्न-संघटनेने ह्या माहितीचा प्रसार करण्यासाठी एक स्वतंत्र मोहीमच चालू करावी.

---

### वर्णभेदाचे राजकारण उतण्याची शक्यता

आजच्या जगातील राष्ट्रांचे देण्याघेण्याचे व्यापारी व्यवहार अधिकाधिक गुंतागुंतीचे आणि तापदायक होत चालले आहेत. निरनिराळ्या देशांची चलनपद्धती संकटात सापडून आंतरराष्ट्रीय व्यवहाराकरिता नवी पद्धती सुरू करण्याचा विचार आणि प्रयत्न होत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध देशांच्या चलनांची परस्पर किंमत सार्वभौम सरकारे ठरवीत असली तरी त्याचा अखेरचा पाया अद्याप तरी सोनेच आहे. दक्षिण आफ्रिका हा देश सर्वांत अधिक सोन्याचे उत्पादन करणारा आहे. तेथील खाणीतून दरसाल ८०० टन सोने निर्माण केले जाते. दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या खाणीत सुमारे ५ लाख खाणकामगार काम करीत असतात. त्यांतील बहुतेक कामगार आफ्रिकन वंशाचे आहेत. सुमारे ७५ टक्के तरी कामगार दक्षिण आफ्रिकेजवळील देशांतून आलेले आहेत. त्यांनी आता खाणीतील कामावर बहिष्कार घालण्याचा विचार चालविला आहे. त्यांची ही संकल्पित कृती प्रत्यक्षात उतरली तर दक्षिण आफ्रिकेच्या अर्थ-व्यवस्थेचा कणाच मोडून पडणार आहे. परंतु एवढ्यानेच भागेल असे नाही. तेथील सोन्याचे उत्पादन बंद पडल्यास जगातील सोन्याच्या बाजारावर त्याचा फार वाईट परिणाम होण्याचा संभव आहे. जग सध्या तेलटंचाईच्या संकटात सापडले असतानाच त्यावर सोन्याचे अरिष्ट कोसळल्यास परिस्थिती आणखीच खालावेल.

### मराठवाड्यातील कारखान्यांत वाढ

महाराष्ट्रातील मराठवाडा हा भाग औद्योगिक दृष्ट्या मागासलेला आहे. अलीकडे राज्यातील अशा भागांची भरभराट घडवून आणण्याच्या प्रयत्नांकडे लक्ष दिले जात आहे. मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष श्री. ब्रिजमोहन सन्ना ह्यांनी ह्या भागांतील औद्योगिक प्रगतीची माहिती दिली आहे. ते म्हणतात की, येत्या सहा महिन्यांच्या अवधीत औरंगाबाद विभागात २० ते २५ नव्या औद्योगिक संघटना स्थापन करण्यात येणार आहेत. मागास भागात कारखाने काढण्यास राज्य सरकार प्रोत्साहन देत असून त्यासाठी सवलतीही देण्यात येत असतात. त्यांचा फायदा घेण्यासाठी नव्याने उद्योगधंदे काढू इच्छिणारे पुढाकार घेत आहेत. औरंगाबाद शहरानजीक काढण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीत कारखाने काढण्याची तयारी ६७ उद्योगपतींनी दाखविली आहे. ह्या वसाहतीत गेल्या दोन वर्षांत २५ छोटे उद्योगधंदे आणि ३२ मध्यम आकाराचे उद्योगधंदे स्थापन करण्यात आलेले आहेत. औरंगाबाद विभागाशिवाय जालना, परभणी, बीड, नांदेड आणि उस्मानाबाद ह्या शहरांच्या परिसरातही नवे उद्योगधंदे काढण्यात येत आहेत. ह्या सर्व ठिकाणी मिळून सुमारे १२५ कारखाने उभे राहिले आहेत. मराठवाड्यातील उद्योन्मुख कारखानदारांनी एकत्र येऊन मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स ही संघटना स्थापन केली आहे. महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री श्री. तिडके ह्यांच्या हस्ते संघटनेचे उद्घाटन ८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

---

### ज्वालामुखीपासून विजेचे उत्पादन

इंधनाच्या महागाईमुळे आणि टंचाईमुळे जगातील सर्वच देश संत्रस्त झाले आहेत. त्यातही औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या देशांची विशेषच अडचण झाली आहे. कारण तेथील लोकांचे राहणीचे मान चांगले असल्यामुळे इंधनाच्या टंचाईपायी ते घसरण्याचा संभव निर्माण झाला आहे. ही आपत्ती टाळण्यासाठी औद्योगिक शक्ती मिळविण्याचे इतर मार्ग शोधण्यात येत आहेत. ह्या प्रयत्नातूनच रशियातील शास्त्रज्ञांनी ३ लाख किलोवॅट वीज उत्पादन करणारी एक योजना तयार केली आहे. ह्या योजनेत ज्वालामुखीमधील उष्णतेचा उपयोग करून घेण्यात यावयाचा आहे. रशियाच्या अतिपूर्वेच्या प्रदेशात कामचटका भागात एक जागृत ज्वालामुखी आहे. त्याच्या पोटात प्रचंड उष्णता असलेले रसायन सतत खदखदत असते. हा रस बहुधा खनिजांचा असतो. रशियन शास्त्रज्ञांची कल्पना अशी आहे की ज्वालामुखीच्या शितेभागापासून खाली उतरत जाणारी अनेक विवरे खोदावयाची आणि ज्वालामुखीच्या पोटातील रसायनापर्यंत ती न्यावयाची. ह्यांपैकी काही विवरांच्या मार्गाने जवळच्या नदीतील पाणी पोटातील कढत्या रसायनात ओतावयाचे. मग अर्थातच फार मोठ्या प्रमाणावर वाफ तयार होईल. ही वाफ दुसऱ्या विवरांच्या मार्गाने विद्युतकेंद्राच्या टर्बाइन्समध्ये सोडावयाची; म्हणजे तो फिरू लागून वीज तयार होऊ लागेल. ज्वालामुखीच्या पोटातील उकळत्या प्रवाहाची उष्णता ६०० अंश सेंटिग्रेड इतकी असते. रशियाची ही योजना सफल झाली तर ज्वालामुखीच्या पोटातील उष्णतेचा उपयोग करून वीज निर्माण करण्याचे ते पहिलेच मोठे केंद्र होईल. उष्णोदकाच्या झऱ्यांच्या साह्याने रशियात एक छोटे वीजकेंद्र उभारण्यात आले आहे.

---

### तेलाची बोट फुटल्यामुळे अनर्थ

हिंदी महासागरातील लखदीव बेटानजीक तेलाची वाहतूक करणारी एक अमेरिकन बोट खडकावर आपटून फुटल्याने बेटाच्या आसपासच्या भागात अनर्थ उडाला आहे. ह्या बोटीतील खलाशांना हिंदी नाविकदलाने वाचविले असले तरी त्यातील ३,५०० टन तेल भोवतालच्या समुद्रावर पसरले आहे. बेटापासून ४ मैलांवर असलेल्या एका छोट्या बेटावरील हजारो समुद्रपक्षी मृत्युमुखी पडत आहेत. शिवाय बेटावरील नारळाच्या झाडांनाही धोका उत्पन्न झाला आहे. नारळाची झाडे म्हणजे तेथील रहिवाशांची कामधेनूच म्हणता येईल. बेटाच्या आसपासच्या मत्स्यजीवनालाही तेलाच्या थरामुळे धोका पोचला आहे. तेलाच्या तवंगामुळे केरळच्या किनाऱ्यावरील सागरी जीवनावर आपत्ती कोसळण्याचा संभव आहे.

---

### भारताचे हवाईदल कुचकामी झाले ?

भारताच्या हवाईदलाने १९७१ च्या भारत–पाक युद्धात उत्कृष्ट कामगिरी केली, पण आता तीन वर्षांनंतर त्याची लढाऊ ताकद कुचकामी झाली आहे, अशी भीती एका तज्ज्ञाने व्यक्त केली आहे. त्याचे नाव पुष्पिंदर सिंग असे आहे. हिंदी हवाई दल १९३३–७३ ह्या शीर्षकाचे एक पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केले आहे. त्यात ते म्हणतात की, पाकिस्तानशी पुन्हा युद्ध जुंपण्याचा प्रसंग आला तर हिंदी हवाई दलाला अतिशय कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. कारण त्याची लढाऊ शक्ती कमी झाली आहे. उलटपक्षी, पाकिस्तानच्या हवाई दलात उत्तम लढाऊ विमानांची व दूरवर बॉंबफेक करू शकणाऱ्या चिनी विमानांची भर पडली आहे. शत्रूच्या मर्मस्थानावर आघात करू शकणारी लांब पल्ल्याची विमाने भारताजवळ मात्र नाहीत. सरकार हिंदी हवाई दलाच्या तातडीच्या गरजांची उपेक्षा करीत आहे.

---

**सहकारी साखर-कारखान्यांचे दैनिक**— महाराष्ट्रातील सहकारी साखरकारखाने मुंबई येथे एक मोठा छापखाना सुरू करून एका दैनिकाच्या प्रकाशनास प्रारंभ करणार आहेत. सहकारी क्षेत्राविरुद्ध होणारा अपप्रचार थांबवून शेतकऱ्यांची बाजू जनतेपुढे मांडणे, हा त्याचा उद्देश आहे.

## अफूच्या चोरट्या व्यापाराची चलती

सध्या देशांत चोरट्या आयाती व निर्यातीविरुद्ध भारत सरकारने मोठी मोहीम चालू केली आहे. झडत्या व छापे घालून बेकायदा आयात केलेले सोने, जडजवाहीर, इत्यादी उघडकीस आणण्यात येत आहे. ह्या गदारोळांत उत्तर प्रदेशातून चोरट्या मार्गाने बाहेर पाठविण्यात येणाऱ्या अफूकडे फारसे लक्ष जात नाही. पण, ह्या व्यापाराने गरिबांना सधन केले असून श्रीमंतांना अधिक धनवंत केले आहे. उत्तर प्रदेशात दरसाल सुमारे २४६ हजार किलोग्रॅम अफूचे उत्पादन करण्यात येते. त्यापैकी निम्म्या तरी अफूची निर्यात चोरून बाहेर करण्यात येते असा अंदाज आहे. अर्थात ह्या चोरट्या मालाला सरकारने ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा अधिक किंमत बाहेर मिळत असते. त्यातही खुद्द शेतकऱ्याला किलोमागे २५० रुपयेच भाव मिळतो. चोरटे दलाल मात्र त्याच्या चौपट किंमत दिल्ली, मुंबई, कलकत्ता व मद्रास ह्या शहरांतून मिळवितात. तेथून ती बहुधा जपान, चीन आणि अमेरिकेला निर्यात करण्यात येते. भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान झालेल्या दीर्घ मुदतीच्या कराराप्रमाणे बहुतेक अफू व तिचे उपपदार्थ अमेरिका विकत घेत असते. भारत सरकार एक किलो अफूला तिच्या दर्जाप्रमाणे १०० ते १६० रुपये देत असते. अफूची चोरटी निर्यात करण्यासाठी अनेक युक्त्या योजल्या जातात. मेलेल्या जनावरांतून ती भरण्यात येते; सायकलच्या ट्यूबमधून पाठविण्यात येते. गर्भवती स्त्रीचा बहाणा करून अफू नेणाऱ्या स्त्रियाही आढळून आल्या आहेत.

---

## कलकत्त्यात वेश्याव्यवसायाची वाढ

१९६६ साली वेश्याव्यवसायावर निर्बंध घालणारा कायदा अमलात आणला गेला असला तरी कलकत्त्यामधील वेश्यांच्या व्यवसायावर त्याचा काहीही परिणाम झालेला नाही. उलट, गेल्या १८ वर्षांत वेश्यांची संख्या खूपच वाढलेली आहे. हा व्यवसाय करणाऱ्या नेहमीच्या भागांच्या बाहेरही आता तो पसरलेला आहे. सार्वजनिक रस्त्यावर गिऱ्हाइके शोधणाऱ्या वेश्या आता सहजी दिसून येतात. झगझगाटात चमकणाऱ्या चौरंगी, पार्कस्ट्रीट इत्यादी ठिकाणीही ही दृश्ये दिसू लागली आहेत. त्याशिवाय शहरातील खुल्या मैदानावरही असे प्रकार चालतातच. कायदा अमलात आल्यावर वेश्यांची नोंदणी बंद करण्यात आली. त्यामुळे त्यांची नक्की संख्या सांगणे शक्य राहिलेले नाही. वेश्याव्यवसायाच्या कायद्याप्रमाणे वेश्यांचे समाजात पुनर्वसन करण्यासाठी जे उपाय योजावयाचे ते न योजले गेल्यामुळे ही संख्या मुख्यतः वाढलेली आहे. गेल्या आठ वर्षांत ह्या संदर्भात ६०० व्यक्तींना अटक करण्यात आली. त्यांतील २४० स्त्रिया होत्या. परंतु ह्या कारवाईचा परिणाम झाल्याचे दिसून आले नाही. सततच्या आर्थिक दुरवस्थेमुळेही वेश्यांच्या संख्येत भर पडली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात सर्वच वेश्या उघडपणे व्यवहार करतात असे मात्र नाही. हॉटेल्स, अतिथिगृहे, प्रवाशांची निवासस्थाने, इत्यादी ठिकाणी चोरटा व्यवहारही चालतो.

---

## गोऱ्या लोकांवर अप्रत्यक्ष नरभक्षणाचा आरोप

संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे जगातील विकासाच्या कार्याची माहिती देणारे एक प्रकाशन प्रसिद्ध करण्यात येते. ह्या प्रकाशनाच्या ताज्या अंकात प्रा. ड्रुमों ह्यांनी एक लेख प्रसिद्ध करून जगातील गोरे लोक अप्रत्यक्षरीत्या नरभक्षक असल्याचा आरोप केला आहे. ते म्हणतात की, श्रीमंत गोरे लोक मांसाचा खाण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर वापर करतात. हे लोक दरिद्री लोकांकरता काहीही औदार्य दाखवीत नाहीत. गेल्या वर्षी श्रीमंत देशांतील गुरांना चारण्यासाठी ३८·५ कोटी टन धान्य आणि गळीत धान्यांची पेंड खर्ची पडली. ह्या अन्नपदार्थांचा उपयोग आशिआतील २०० कोटी लोकांना खाद्यपदार्थ पुरविण्यासाठी करता आला असता. आशिआतील बहुतेक लोक अन्नधान्याचा उपयोग बहुतांशी स्वतः खाण्यासाठी करतात. ह्याचा अर्थ असा की मांसाचा उपयोग भरमसाट केल्याने इथिओपिआतील आणि बांगला देशातील भुकेपोटी मेलेली मुलेच त्यांनी अप्रत्यक्षरीत्या खाल्ली आहेत. अन्नधान्याचा हा वापर ह्या वर्षीही असाच चालू आहे. मुसलमानी व ख्रिश्चन धर्मांच्या प्राचीन शिकवणुकीप्रमाणे प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाचा एक दशांश भाग गरिबांकरता राखून ठेवला पाहिजे. ख्रिस्ताच्या वेळी त्या वेळच्या श्रीमंताजवळ आजच्या मानाने कितीतरी कमी संपत्ती होती. तरीही हा आदेश देण्यात आला होता. १९७३ सालातील श्रीमंत गोऱ्या लोकांनी मात्र आपल्या उत्पन्नाचा ०·१५ टक्के भागच भुकेलेल्यांना देण्याचे औदार्य दाखविले आहे.

---

## पंतप्रधानांना मध्यम वर्गाची साथ नाही

'इलस्ट्रेटेड वीकली' ह्या साप्ताहिकाचे संपादक श्री. खुशवंतसिंग ह्यांनी चंदीगढ येथे बोलताना असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, सध्याच्या आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी जे प्रयत्न करीत आहेत त्यांना हिंदुस्थानातील मध्यम वर्ग मनापासून पाठिंबा देत नाही. ह्या बाबतीत मध्यम वर्ग आपले कर्तव्य बजावीत नाही, असा आरोपही त्यांनी केला. सध्या देशातील साठेबाजांविरुद्ध, काळ्या पैशांच्या चालकांविरुद्ध आणि चोरट्या व्यापाराविरुद्ध जोराची मोहीम त्यांनी सुरू केली आहे. पंतप्रधानांसारखा तडफेचा आणि कार्यक्षम पुढारी लाभणे ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे. परंतु ह्या गोष्टीची जाणीव भारतामधील मध्यम वर्गाला नाही, असा समारोप त्यांनी केला.

---

## चौथ्या पंचवार्षिक योजना काळातील औद्योगिक उत्पादनामधील मंद वाढ

मार्च अखेरचे वर्ष (% वाढ/घट)

| औद्योगिक गट | १९६९-७० | १९७०-७१ | १९७१-७२ | १९७२-७३ | १९७३-७४ | चक्रवाढ गतीने वाढ | वार्षिक वाढीच्या गतीचे लक्ष्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मूलभूत उद्योग | ९.४ | ३.४ | ६.९ | ७.३ | (२.४) | ४.९ | ९.९ |
| भांडवली माल उद्योग | १.४ | ६.० | ०.४ | १०.४ | ११.९ | ५.९ | १७.१ |
| मध्य परिमाण उद्योग | ३.८ | १.२ | ३.६ | ४.३ | (१.१) | २.३ | ५.८ |
| कंझ्युमर्स माल उद्योग | १०.२ | ४.५ | ५.२ | १.४ | (२.९) | ३.६ | ५.३ |
| सर्व उद्योग | ७.४ | ३.० | ३.३ | ५.३ | ०.५ | ३.९ | ८.१० |

चौथ्या पंचवार्षिक योजना कालातील गेले वर्ष (१९७३-७४) सर्वात कमी वाढीच्या गतीचे होते. ह्या वर्षी औद्योगिक उत्पादन फक्त ३.९% गतीने वाढले; योजनेचे लक्ष्य वार्षिक ८.१०% एवढे आहे. पंचवार्षिक योजनेच्या पाचही वर्षी ठेवलेल्या लक्ष्यापेक्षा कमी गतीने वाढ झाली. १९७३-७४ साली भांडवली मालाचा उद्योग वगळला तर बाकी सर्व उद्योगांनी वाढीऐवजी घटच दाखविली.

मशीन टूल्सचे उत्पादन सालिना २४.०% ने वाढले. कपास कापड गिरण्यांच्या मशिनरीचे उत्पादन सालिना २०.५% ने वाढले; नत्रयुक्त खते १४.०४%, टॅक्टर्स ८.३%, अशी इतर उत्पादनवाढीची गती होती. शिवणाच्या यंत्रांच्या उत्पादनवाढीचा वेग ९% ने, रेल्वे वॅगन्सचा ५.५% ने, सायकलीच्या टायर्सचा ३.५% ने वनस्पतीचा ०.८% ने कमी झाला. साखर-साबणाच्या उत्पादनवाढीची गती जवळजवळ वाढली नाहीच.

### रुमानिआकडून खत मिळविण्याचा प्रयत्न

हिंदमधील अन्नधान्याचे उत्पादन त्वरित वाढविण्यासाठी रासायनिक खतांची फार मोठी गरज आहे. देशातील उत्पादन अपुरे असल्यामुळे भारत सरकार मिळेल तेथून खते आयात करण्याचे प्रयत्न करीत आहे. भारत आणि रुमानिआ ह्या दोन देशांत आर्थिक, तांत्रिक व शास्त्रीय सहकार्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंडळाची अलीकडे बैठक झाली. ह्या बैठकीत रुमानिआकडून रासायनिक खते मिळविण्याच्या प्रश्नाला चालना मिळाली आहे. रुमानिआला लोहखनिज पुरवून त्याच्या बदला रासायनिक खते मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. खताप्रमाणेच भारतामधील खनिज तेलाच्या साठ्याचा शोध घेणे आणि तेलशुद्धीकरण कारखान्यांची उभारणी ह्या बाबतीतही रुमानिआकडून मिळू शकणाऱ्या सहकार्याची चर्चा बैठकीत करण्यात आली.

### एअर इंडिआसाठी नवी विमाने

एअर इंडिआने बोईंग ७३७ जातीची चार विमाने मिळविण्यासाठी करार केला आहे. त्यापैकी दोन विमाने लवकरच हाती येणार असून २ नोव्हेंबर १९७४ रोजी कंपनीच्या हवाली करण्यात येणार होती. ही विमाने पुरविण्याच्या करारातील अटीप्रमाणे एअर इंडिआन फक्त १० टक्के किंमत चुकती करावयाची आहे. बाकीची किंमत अमेरिकेची निर्यात आयात बँक आणि एक व्यापारी बँक मिळून अर्धी अर्धी देणार आहेत. एकूण १.९६ कोटी डॉलर्स किमतीपैकी १.७२ कोटी डॉलर्स रक्कम दोन्ही बँका देणार आहेत. १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धानंतर अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँककडून मिळालेले हे पहिले कर्ज आहे.

### इस्रायलमध्ये कर्जरोख्यांच्या खरेदीची सक्ती

इस्राएली सरकारने युद्धकर्जरोख्यांच्या स्वरूपात इस्राएली नागरिकांवर आणखी एक कर बसवला आहे. प्रत्येक इस्राएली नागरिकाला आपल्या एकूण उत्पन्नाच्या सव्वादोन टक्के रकमेचे कर्जरोखे यापुढे सक्तीने विकत घ्यावे लागतील.

### एक कोडे

एका मनुष्याजवळ दोन म्हशी होत्या. त्या त्याने प्रत्येकी १०० रुपयांस विकल्या. एका म्हशीचे विक्रीत त्याला २५ टक्के नफा झाला आणि दुसऱ्या म्हशीचे विक्रीत त्याला २५ टक्के नुकसान आले. तर त्यास एकूण नफा अगर तोटा किती आला?

### पकडलेला चोरटा माल

१९६६ मध्ये ६.६ कोटी रु. चा चोरटा माल पकडण्यात आला, तर गेल्या वर्षी ३५.५ कोटी रु. चा चोरटा माल सापडला. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत २८.८ कोटी रु. चा चोरटा माल पकडण्यात आला.

### बड्या फर्म्सनी कर्जाचा गैरवापर केला नाही

"प्रत्येक बँकेच्या कर्जखात्यांपैकी अग्रेसर ५० कर्जखात्यांची तपासणी रिझर्व्ह बँकेने केली, तेव्हा ह्या कर्जदारांनी कर्जाचा गैरवापर केल्याची विशेष उदाहरणे आढळली नाहीत. काहींनी कच्च्या मालाचा बराच साठा केला होता, परंतु त्यांना त्याची आवश्यकता दाखवून देता आली" असे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी सांगितले.

# " एकमेकां सहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ "
## या उक्तीचे
# औद्योगिक व्यवस्थापनातील स्थान

(श्री. आइ. डी. कुलकर्णी, बी. ए., जी. डी. सी. ॲण्ड ए.)

यशोधरा औद्योगिक सहकारी संस्था लि., उद्यमनगर ही वीज उत्पादनासाठी लागणारी एंजिने, मशिनरीचे सुटे भाग व तदनुषंगिक उपकरणे तयार करणारी, सहकारी कायद्यान्वये स्थापन झालेली सोसायटी असून, तिच्या पहिल्या तीन वर्षांसाठी सरकार नियुक्त असलेले मा. संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कामकाज प्रगतिपर असे चालू होते. संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून सहकारी खात्यातील एक सेवानिवृत्त कार्यक्षम अधिकारी, श्री. बाळकृष्णराव यांची पहिल्या पाच वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली होती व त्यांच्या नियंत्रणाखाली मुख्यत्वे संस्थेचे सेक्रेटरी, चीफ इंजिनिअर, सेल्स् मॅनेजर, चीफ अकौंटंट, लेबर ॲण्ड वेलफअर ऑफिसर, स्टोअर्स सुपरिटेण्डेण्ट, हे खातेप्रमुख अधिकारी काम करीत असून त्यांच्या हाताखाली संस्थेचे कारखान्यात देखरेख करणारे सुपरवायझर्स, तसेच कुशल व अकुशल कामगार व ऑफिसमध्ये टायपिस्ट व कारकून कामास होते व सर्वजण आपापल्या कामात तरबेज होते.

सोसायटीच्या सरकारनियुक्त पहिल्या मा. संचालक मंडळाची तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर, सोसायटीच्या पोटनियमाप्रमाणे तिच्या नवीन संचालक मंडळाची पहिली निवडणूक होऊन सतरा सदस्यांचे सोसायटीचे पहिले निवडून आलेले संचालक मंडळ अस्तित्वात आले व त्याचे पहिले अध्यक्ष म्हणून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून गणले जाणारे उद्यमनगर येथील प्रतिष्ठित नागरिक श्री. जयंतराव यांची एकमताने निवड करण्यात आली. नवीन निवडून आलेल्या संचालक मंडळाचे मा. अध्यक्ष व इतर काही सदस्य तरुण व उत्साही असल्याने त्यांनी आपल्या सोसायटीच्या कामकाजात व व्यवहारात द्रुतगतीने प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. बाळकृष्णराव यांच्याशी विचारविनिमय करून, संस्थेच्या व्यवहारात व कामकाजात काही नवीन योजना कार्यवाहीत आणण्याबद्दलचा त्यांचा मनोदय व्यक्त केला व त्याप्रमाणे सोसायटीचे मा. संचालक मंडळाची व पोटनियमातील तरतुदीनुसार साधारण सभेची अवश्य ती नवीन योजनेच्या कार्यवाहीस व त्याच्या खर्चास मंजुरी देण्यात आली. संस्थेचे मा. संचालक मंडळाने वरीलप्रमाणे नवीन योजनांच्या बाबतीत घेतलेला निर्णय त्वरित कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने मा. कार्यकारी संचालक यांनी तो सविस्तर परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित खातेप्रमुख व अधिकारी यांना कळविला व निर्दिष्ट केल्याप्रमाणे योजना कार्यवाहीत आणण्याच्या त्वरित सूचना सादर करण्याचा त्यांना आदेश दिला. उपरिनिर्दिष्ट नवीन योजना द्रुतगतीने कार्यवाहीत आणण्याच्या कामी प्रशिक्षित असा तज्ज्ञ व अभ्यासवृत्तीचा इलेक्ट्रिकल इंजिनिअर, विद्यमान चीफ इंजिनिअर यांना मदतनीस म्हणून नेमण्यात यावा व तसेच संस्थेच्या कारखाना विभागातील विद्यमान होतकरू सुपरवायझर्स व कामगार यांना अवश्य ते प्रशिक्षण देण्यात यावे असे धोरण संस्थेच्या संचालक मंडळाने आखले असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

संस्थेचे मा. संचालक मंडळाने वरीलप्रमाणे आखलेल्या धोरणास अनुसरून, संस्थेमध्ये एका प्रशिक्षित तरुण व तज्ज्ञ इलेक्ट्रिकल इंजिनिअरची नेमणूक करण्यात आली व संस्थेच्या व्यवहारामध्ये द्रुतगतीने प्रगती घडवून आणण्यासाठी कार्यवाहीत आणाव्या लागणाऱ्या कित्येक अभ्यासपूर्ण योजना त्याने संस्थेचे चीफ इंजिनिअर यांच्या मार्फत मा. कार्यकारी संचालकाकडे सादर करण्यास सुरुवात केली, तथापि त्यांच्या व चीफ इंजिनिअर यांच्या नवीन योजनांबाबतच्या शिफारशींच्या दृष्टिकोनात एकवाक्यता न होत गेल्याने, तसेच नवीन योजना कार्यवाहीत आणताना नव्याने होणाऱ्या उत्पादनाची ग्राहकांवर काय प्रतिक्रिया होईल, तसेच नवीन योजना कार्यवाहीत आणल्याने संस्थेवर जादा आर्थिक बोजा किती पडेल व त्याची तरतूद कशी करावयाची इत्यादी बाबीसंबंधी संस्थेचे सेल्स् मॅनेजर, चीफ अकौंटंट यांच्याशी विचारविनिमय करीत असता, अडचणी उद्भवत गेल्याने, संस्थेच्या मा. कार्यकारी संचालकांना नवीन योजना अवश्य त्या शिफारशींसह मा. संचालक मंडळापुढे मांडणे दुरापास्त होऊ लागले. नवीन योजनांच्या कार्यवाहीबद्दल वरीलप्रमाणे ज्या अडचणी येऊ लागल्या तशाच अडचणी कामगार प्रशिक्षित करण्याबाबतही एकवाक्यता होऊ न शकल्याने, उद्भवू लागल्या व अशा रीतीने संस्थेचे नवीन निवडून आलेले मा. संचालक मंडळाने अत्यंत उत्साहाने मंजूर केलेल्या नावीन्यपूर्ण धोरणाची कार्यवाही बराच काळपर्यंत होऊ शकली नाही. दरम्यान, संस्थेचे कार्यकारी संचालक, श्री. बाळकृष्णराव यांची संस्थेकडील पाच वर्षांची मुदत संपल्याने व संस्थेचे वर्धिष्णु व्यवहाराचे सेवेत यापुढे राहणे त्यांच्या प्रकृतीस झेपणार नाही असे त्यांना वाटल्याने त्यांना संस्थेचे सेवेतून त्वरित मुक्त करण्यात यावे अशी त्यांनी संस्थेचे मा. संचालक मंडळास विनंती केली ती स्वीकारण्यात आली व त्याप्रमाणे त्यांच्या कामाचा तात्पुरता चार्ज संस्थेचे सेक्रेटरी यांच्याकडे सुपूर्त करण्यात येऊन कार्यकारी संचालक यांना संस्थेच्या सेवेतून मुक्त करण्यात आले.

तदनंतर संस्थेचे कार्यकारी संचालकाच्या जागेवर, व्यवस्थापकीय क्षेत्राचे शास्त्रशुद्ध ज्ञान असलेल्या व औद्योगिक प्रशासनाचा पुरेसा अनुभव असलेल्या तज्ज्ञ कार्यक्षम व उत्साही व्यक्तीची नियुक्ती करण्याचे धोरण संस्थेचे मा. संचालक मंडळाने ठरविले व या धोरणास अनुसरून अशा प्रकारच्या श्री. कृतिश्रेष्ठराव या तज्ज्ञ व्यक्तीची संस्थेचे कार्यकारी संचालकपदी नियुक्ती

करण्यात आली. श्री. कृतिश्रेष्ठराव यांनी संस्थेचे कार्यकारी संचालकपदाची सूत्रे औपचारिकपणे संस्थेचे सेक्रेटरी यांच्याकडून हाती घेतल्यानंतर, संस्थेच्या कार्यात सातत्याने वरीच प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने वेळोवेळी संस्थेच्या खातेप्रमुखांच्या व अधिकाऱ्यांच्या बैठकी घेऊन, कामाची नवचैतन्यपूर्ण कार्यपद्धती प्रामाणिक व उत्साही कामगारांना निःपक्षपातीपणे प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देऊन अमलात आणण्याचे प्रयत्न सुरू केले व त्यास संस्थेचे मा. संचालक मंडळाचे प्रगतिशील अध्यक्ष मा. श्री. जयवंतराव व इतर सदस्य यांची अनुमती मिळवून संस्थेच्या पोटनियमांतील तरतुदीस अनुसरून धोरण अमलात आणण्यास सुरुवात केली. तसेच या धोरणाची प्रभावीपणे कार्यवाही होण्याच्या दृष्टीने श्री. कृतिश्रेष्ठराव यांनी संस्थेचे चीफ इंजिनिअर व इलेक्ट्रिकल इंजिनिअर तसेच इतर खातेप्रमुख व सुपरवायझर्स यांच्यामध्ये अत्यंत विश्वासाचे व खेळीमेळीचे वातावरण राहील हे पाहून संस्थेचे कामकाज सतत प्रगतिपथावर ठेवण्याचे प्रयत्न प्रामाणिकपणे चालू ठेवले व या प्रयत्नाची फलद्रूपता संस्थेच्या प्रगतिपर कामकाजातून दृग्गोचर होऊ लागली. श्री. कृतिश्रेष्ठराव यांच्या या उत्तेजनात्मक व निःपक्षपाती प्रभावी धोरणामुळे, जास्तीत जास्त संस्थेने अधिकारी, सुपरवायझर्स व कामगार प्रशिक्षित होऊ लागले व त्यायोगे त्यांना संस्थेच्या प्रगतीबरोबर स्वतःची वैयक्तिक प्रगतीही साध्य करता येऊ लागली. अशा परिस्थितीत, या संस्थेमध्ये जरी कामगार युनिअन कायद्याप्रमाणे अस्तित्वात आली असली तरी तिचे संस्थेच्या मॅनेजमेंटशी संबंध सलोख्याचे राहू शकले. अशा रीतीने संस्थेचे कामकाज एकदिलाने अव्याहतपणे चालू राहिल्याने 'यशोधरा औद्योगिक सहकारी संस्था लि. उद्यमनगर' या संस्थेने अल्पावधीत खऱ्या अर्थाने 'यशोधरा' हे तिचे नाव सार्थ केले व ती सर्वांचे नावलौकिकास पात्र ठरली.

सहकारी संस्थेचे उद्दिष्ट 'एकमेकां साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ', हे कार्यवाहीत आणण्याच्या कामी वरील संस्थेने केलेल्या प्रगतीचा विचार करता तिचे मा. संचालक मंडळ व मा. अध्यक्ष हे तिचा 'आत्मा' व मा. कार्यकारी संचालक हे तिचे 'हृदय' असे म्हणणे सयुक्तिक होणार नाही का!

---

### हिंदुस्थान शिपयार्डला निर्यातीची मागणी

भारत सरकारच्या मालकीच्या हिंदुस्थान शिपयार्ड ह्या कंपनीला बोटी बांधण्याची एक परदेशी मागणी मिळण्याची शक्यता आहे. ब्रिटनमधील एका बोट कंपनीसाठी ५ बोटी बांधण्याविषयी सध्या कंपनीच्या वाटाघाटी चालू आहेत. बोटींची मागणी मिळाल्यास त्या १९७७ मध्ये निर्यात कराव्या लागतील. वाटाघाटी यशस्वी झाल्यास हिंदुस्थान शिपयार्ड मध्ये परदेशासाठी बोटी बांधण्याचा हा पहिलाच प्रसंग ठरेल. शिवाय कारखान्याला बोटींच्या किमतीच्या ५ टक्के रक्कम आगाऊ मिळेल आणि त्याचा खेळत्या पैशाचा प्रश्नही सुटेल.

★ ★ ★

धनवर्धिनी परंपरेतील
११ ४ नवीन योजना

कर्जहमी ठेव योजना
ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरुवातीलाच हमी

विशेष सेव्हिंग्ज खाते
८.७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.

मुदतीचे सेव्हिंग्ज खाते
७.२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे

मासिक व्याज ठेव योजना
किमान १००० रु. (नव्या स्वरूपात)
कमीत कमी १ वर्ष मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील
भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

★ ★ ★

## हिंदुस्तान एरोनॉटिक्स कंपनीपुढील अडचणी

कानपूर येथील हिंदुस्थान एरोनॉटिक्स कंपनी सध्या अडचणीच्या परिस्थितीत सापडली आहे. कंपनीकडे इंडियन एअरलाईन्स आणि भारत सरकारच्या संरक्षणखात्याकडून येणाऱ्या मागण्या थंडावल्या आहेत. त्याचा हा परिणाम आहे. कारखान्याने ६५ ॲव्हरो जातीची विमाने तयार केली होती. त्यापैकी १७ इंडिअन एअरलाइन्स कंपनीला आणि ४१ हिंदी हवाई दलाला देण्यात आली. बाकीच्या विमानांना मागणी नाही. शिवाय त्याच्या विम्यापोटी कंपनीला ८.९३ लाख रुपये द्यावे लागलेले आहेत. कंपनीकडे अजून वैमानिकांना शिक्षण देण्यासाठी लागणाऱ्या ११ ॲव्हरो विमानांची मागणी आहे. संरक्षण खात्याची ही मागणी पूर्ण करण्यास पुढील मार्चपर्यंतचा अवधी पुरेल. मग मात्र नव्या मागण्यांची तातडीची जरूर निर्माण होईल. ॲव्हरो जातीच्या दोन विमानांना अपघात झाल्यापासून इंडिअन एअरलाइन्सच्या वैमानिकांनी विमाने चालविण्यास नकार दिला होता. ह्या अपघाताची चौकशी करण्यासाठी कमिशन नेमण्यात आले आहे. त्याचा अहवाल अद्याप यावयाचा आहे. परंतु तो येईपर्यंत भारत सरकारच्या संरक्षण खात्याने ५० विमानांसाठी नोंदविलेली मागणी रद्द करण्यात आली आहे. ही विमाने छत्रीधारी सैनिकांच्या वाहतुकीसाठी घेण्यात येणार होती. दरम्यान कंपनीला शेतीच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या 'वसंत' विमानांची मागणी मिळाली. १०० विमानांची ही मागणी पुरी करण्यास १९७८ ची अखेर उजाडेल. पण, त्यांची निर्मिती करण्यासाठी कारखान्याच्या ५,००० कामगारांपैकी अवघ्या ८०० जणांचीच गरज लागणार आहे. अर्थातच बाकीच्यांना बेकार व्हावे लागेल.

---

## ३१० चित्रपटांत फक्त ६ मराठी

१९७४ च्या पहिल्या नऊ महिन्यांत एकूण ३१० चित्रपट सेन्सॉरनी पास केले. त्यांपैकी १०० हिंदी, २३ बंगाली, ५७ तामीळ, २२ कानडी, ४८ तेलगू, ४० मल्याळी, ६ मराठी, ४ गुजराती, प्रत्येकी २ मणिपुरी, आसामी आणि पंजाबी, आणि प्रत्येकी १ तुलु, हरयाणी, इंग्रजी आणि ओरिया भाषेतील होते. १०३ चित्रपटांना मुंबईत, २८ ना कलकत्त्यात आणि १७९ ना मद्रासमध्ये मंजुरी मिळाली. स्मगलिंग आणि गुन्हेगारीविषयक चित्रपटांची संख्या वाढत आहे; ऐतिहासिक चित्रपट एकही निघाला नाही. पूर्वीच्या कोणत्याही वर्षापेक्षा १९७४ मध्ये सुवर्णमहोत्सव अधिक झाले — राजकपूरचा 'बॉबी' (७ ठिकाणी), प्रकाश मेहराचा 'जंजीर', नासिर हुसेनचा 'यादों की बारात' आणि प्रमोद चक्रवर्तीचा 'जुगनू'. रौप्यमहोत्सवांची संख्याही पूर्वीच्या कोणत्याही वर्षापेक्षा बरीच अधिक भरली.

---

## लिज्जत पापड उद्योगाची प्रगती

श्री महिला गृहउद्योग संघटनेने लिज्जत पापडाची विक्री करण्याचा उच्चांक गाठला आहे. ही एक सामाजिक सेवा करणारी संघटना असून ती सर्वस्वी स्त्रियांनी चालविली आहे. १९७३-७४ साली संघटनेने १ कोटी रुपयांपेक्षाही अधिक किंमतीच्या पापडांची विक्री केली. स्त्रियांना स्वावलंबी करणाऱ्या ह्या संघटनेचा माल भारतात तर अनेक ठिकाणी खपतोच; पण परदेशातही त्याला बाजारपेठ मिळत आहे. गेल्या वर्षी १४ लाख रुपयांचे पापड निर्यात करण्यात आले होते. चालू वर्षी २० लाख रुपयांचे निर्यात करण्यात येतील असा अंदाज आहे. सुमारे १५ वर्षांपूर्वी ह्या संघटनेची स्थापना एक प्रयोग म्हणून करण्यात आली. आता तिचा पसारा पुष्कळच वाढला आहे. संघटनेच्या सभासदांची संख्या आता २,५०० वर गेली आहे.

---

## नसबंदी करण्यासाठी सिमेंटचे प्रलोभन

लोकसंख्येला आळा घालण्यासाठी पुरुषांवर नसबंदीची शस्त्रक्रिया करण्याचा उपाय खात्रीचा समजला जातो. पण पुरुष सहसा ही शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार नसतात. त्यांना शस्त्रक्रिया करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी गोरखपूर जिल्ह्यात सिमेंटचे प्रलोभन दाखविण्यात आले. जो पुरुष ही शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार होईल त्याला ५ पोती सिमेंटचा परवाना देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. आणि काय चमत्कार! गेल्या सप्टेंबर महिन्यात १,८०० पुरुषांनी नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेतली. त्यापूर्वीच्या ५ महिन्यांत मिळून अवघ्या ४० पुरुषांनी शस्त्रक्रिया करून घेतली होती. नसबंदीसाठी नेहमीची रोख रक्कमही देण्यात येत होती.

---

## गुजरात राज्यात खते साठून राहिली

गुजरात राज्यात १० कोटी रुपये किंमतीची रासायनिक खते साठून राहिली आहेत. खतांना पुरेशी मागणी नाही. राज्यात अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थिती उद्भवल्याने आणि खतांच्या किंमती भरमसाठ वाढल्याने मागणी घटली आहे. शेतीच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीला राज्य सरकार मध्यवर्ती सरकारच्या साठ्यातून अधिक खताची मागणी करीत होते. १९७४ च्या ऑगस्टपासून जानेवारी १९७५ पर्यंत राज्य सरकारला ६० हजार टन खते पुरविण्याचे मंजूर करण्यात आलेले आहे. खताचा उठाव होत नसल्याने गुजरात सरकार मध्यवर्ती सरकारकडे आता खताची मागणी कमी प्रमाणात करीत आहे. आतापर्यंत गुजरात सरकारने मध्यवर्ती सरकारच्या साठ्यातून अवघे १,५०० टन खत प्रत्यक्ष घेतले आहे.

---

## बनावट परदेशी चलनाचा धंदा

परदेशी हुंडणावळीवरील नियंत्रणामुळे बनावट चेक्स, ड्राफ्टस, नोटा वगैरेची भारत ही मोठीच बाजारपेठ बनलेली आहे. भारतामधून परदेशी जाणाऱ्या भारतीय नागरिकाला आठ डॉलर्सपेक्षा जास्त चलन मंजूर केले जात नाही! तेवढ्या पैशात दररोज कॉफीसुद्धा मिळू शकणार नाही. एअर इंडियाने प्रवास करणाराला १०० डॉलर्स नेता येतात, त्या रकमेत एक आठवड्याचे फार तर खाणे होऊ शकते. सरकारने परदेशी प्रवासाला तरी बंदी घालावी नाहीतर मुक्त हस्ते परदेशी हुंडणावळीवर मंजूर करावी. अन्यथा, बनावटगिरीला प्रोत्साहन मिळणारच; काळ्या पैशाचा वापर आणि फसवणूक चालूच राहणार.

असे म्हणतात की भारतीय आणि परदेशी बनावट चलन विकणाऱ्या किमान सात टोळ्या एकट्या मुंबईमध्ये आहेत. त्या टोळ्यांच्या प्रमुखांनी टोपणनावे धारण केलेली असतात: फतिमा, गोपी, हबीब, कुरेशी, बच्चू, दिलीप, इत्यादी. ह्या टोळीवाल्यांना एक गोष्ट फार अनुकूल असते, ती म्हणजे त्यांची गिऱ्हाइके पोलिसांकडे तक्रार करू शकत नाहीत. बहुधा काळा पैसाच देऊ करून परदेशी चलन मागितले जाते आणि ह्या चलनाचे ड्राफ्ट आणि डॉलर परदेशात वटू शकले नाहीत, म्हणजे फसवणूक लक्षात येते. तीन सिनेस्टार्सची हकीकत प्रसृत झालेली आहे. एकाने तीन लक्ष रुपये देऊन परदेशी चलनाचे ड्राफ्ट विकत घेतले. तो इराणमध्ये गेला, तेव्हा त्या ड्राफ्टपैकी निम्मे ड्राफ्ट बनावट होते, हे त्याच्या लक्षात आले. दुसऱ्या कलावंताला इंग्लंडमध्ये गेल्यावर स्वतःची तीन लक्ष रुपयांची झालेली फसवणूक लक्षात आली. तिसरा अमेरिकेत गेल्यावर ड्राफ्ट वटेवू लागला, तेव्हा त्याचे चार लक्ष रु. बुडल्याचे त्याला समजून आले. परदेशी चलनाला खूप मागणी असल्यामुळे परदेशी नोटा, ट्रॅव्हलर्स चेक्स आणि बँक ड्राफ्ट बनावट करण्याचा धंदा तेजीत चालतो. भारताच्या नोटाही बनावट तयार केल्या जातात. बनावट नोटा, इत्यादी करण्याचे कारखाने दक्षिण भारतात आणि गुजरातमध्ये मुख्यत: आहेत.

जाफर प्रमुख असलेल्या, बनावट चेक-ड्राफ्ट करणाऱ्या टोळीच्या गुन्ह्याची चौकशी असि. कमिशनर ऑफ पोलिस मोकाशी यांनी केली. टोळीतील एक आरोपी दक्षिण आफ्रिकेत पळून गेला. मोकाशी त्याच्या पाठोपाठ पूर्व आफ्रिकेपर्यंत गेले. परंतु दक्षिण आफ्रिकेशी आपले राजनैतिक संबंध नसल्यामुळे त्यांना परतावे लागले. इंटरपोलमार्फत चौकशीचा प्रयत्न करण्यात आला. ह्या प्रकरणातील शेवटचा अंक म्हणजे त्या आरोपीने दक्षिण आफ्रिकेतून मोकाशींना स्वतःच्या मुलीच्या विवाहाची निमंत्रण-पत्रिका पाठविली!

मुंबईतील एका सबइन्स्पेक्टरचे एका अशाच टोळीशी जरा जवळचे संबंध होते. ह्या टोळीने त्याच्याजवळ ठेवायला दोन लक्ष रु. दिले होते, पण त्याने ते लुबाडले अशी त्या टोळीने तक्रार करून त्याला शासन करण्याचे ठरविले. टोळीने काही गुंडांकरवी त्याच्या तोंडावर ॲसिड फेकले; त्या जखमी पोलिस अधिकाऱ्याला गुन्हेगार 'ओळखता' आला नाही.

भांडूप येथील एका राष्ट्रीयीकृत बँकेत एकाने बनावट ट्रॅव्हलर्स चेकचे पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याला संशयावरून अटक करण्यात आली. असि. इन्स्पेक्टर खोतांनी तपास केला तेव्हा टोळीने दोन बँकांत असेच बनावट ड्राफ्ट कॅश केले असल्याचे त्यांना आढळले. हे लबाड लोक बनावट ड्राफ्ट किंवा चेक कॅश करताना स्वतःचा पासपोर्ट घेऊन जायचे; चेक किंवा ड्राफ्टवर नाव असलेल्याचाच तो पासपोर्ट असायचा. पण ते पासपोर्टच मुळी बनावट होते!

---

### स्मगलिंगच्या नकाशावरील प्रमुख केंद्र-दुबई

ओमनच्या किनाऱ्यावर वसलेले दुबई राज्य हे स्मगलिंगच्या नकाशावरील प्रमुख शहर असून येथून आंतरराष्ट्रीय पातळीवर या धंद्याचा व्यवहार चालतो. दुबई येथे जकातविषयक विशेष अशी आडकाठी नसल्यामुळे स्मगलरांचे तेथे चांगलेच फावते. भारतात ज्या अनेकविध मार्गांनी सोने येते त्याची सुरुवात बहुतांशी दुबईपासूनच झालेली असते. इंग्लंड व इतर युरोपियन देशांतून मोठ्या प्रमाणावर तेल-समृद्ध बहरीनला सोने निर्यात होते. तेथून ते दुबईमार्गे वाटचाल करीत भारतात पोहोचते. सोन्याची वाटचाल सोयीस्कर व सुखाची व्हावी म्हणून स्मगलर्स नानाविध शकली लढवितात.

---

### हवाई कर्मचाऱ्यांचा स्मगलिंगमध्ये हात

सोन्याची चोरटी आयात प्रकरणी काही वर्षांपूर्वी ब्रिटीश एअर लाइन्सच्या कर्मचाऱ्यांना पकडण्यात आले होते. परिणामत: एअर लाईन्सने त्यांच्या अनेक कर्मचाऱ्यांना भारतात येण्यास मज्जाव केला. त्यात स्टुअर्डसचा भरणा अधिक होता. ते सर्व जण संशयित स्मगलर्स होते. हे स्टुअर्डस् पुष्कळ गुप्त खिसे असलेली जाकिटे घालीत. त्या खिशात सुमारे एक लाखाचे सोने दडविलेले असे. अशा रीतीने लाखो रुपये किमतीच्या सोन्याची चोरटी आयात करण्यात आली, असे बीओएसीच्या प्रमुख सुरक्षा अधिकाऱ्यांनी नंतर सांगितले.

---


**"अर्थ"चा दिवाळी अंक**

"अर्थ"चा दिवाळी अंक नेहमीप्रमाणे मोठ्या स्वरूपात प्रसिद्ध होईल. ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती अद्याप पाठविण्याच्या राहिल्या असतील त्यांनी त्या त्वरेने पाठवाव्या, अशी विनंती आहे.

व्यवस्थापक






**BANK TO BANK...**

# THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth**

**BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 46 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT,** *General Manager.*

**V. M. DALAL** *Chairman.*



" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आपली बँक**



# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

- हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
- टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

♣

फोन नं. :–२८३३०] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और दूसरे देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुवदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. संघनित द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**





[illegible] सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

नगर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७२ कारखाना : [illegible]



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)